पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक /नस -०३/कावि/४९४/२०१६
दिनांक ०१/०७/२०१६

प्रति,

मा,............................................

सदस्य,स्थायी समिती ,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी - ४११ ०१८ .

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा दिनांक ०५/०७/२०१६ रोजी आयोजित केले बाबत ....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक ०५/०७/२०१६ रोजी दुपारी २.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी – ४११ ०१८

मा.स्थायी समिति

**कार्यपत्रिका क्रमांक – २३१**

दिनांक - ०५/०७/२०१६ वेळ – दुपारी २.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक ०५/०७/२०१६ रोजी दुपारी २.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक २८/०६/२०१६ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २३०) चा सभावृतांत कायम करणे.

विषय क्र. १) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. ५७/६/१५-१६ अन्वये, वॉर्ड क्र.७६ रहाटणी सर्व्हे नं.४३ ते सर्व्हे नं.१२५ मधील विकास आराखड्यातील १८.०० मी. रुंदीचा रस्ता विकसीत करणेकामी मे.लोनावळा कन्स्ट्रक्शन कं. नि.र.रु.८४,०३,३६१/- (अक्षरी र.रु. चौऱ्याऐंशी लाख तीन हजार तीनशे एकसष्ठ) पेक्षा २१.१०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.६९,६१,७६४/-पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ /घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

( दिनांक ०५/०७/२०१६ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे )

विषय क्र. २) मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४/२३-२०१५-१६ मधील अ.क्र. २३ अन्वये प्रभाग क्र.३७ महात्मा फुलेनगर झोपडपट्टी येथे पुरुषासाठी शहाजी गायकवाड यांच्या घराशेजारी २६ सिट्सचे शौचालय बांधणेकामी मे.श्रीयश कंन्स्ट्रक्शन नि.र.रु.४२,०१,३६५/- (अक्षरी र.रु.बेचाळीस लाख एक हजार तीनशे पासष्ट फक्त) पेक्षा १.५०% जास्त या ठेकेदाराकडून निविदा मजुंर दराने र.रु.४२,६४,३८५/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ / घट दरानुसार फरकाची रक्कम अदा

/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

( दिनांक ५/०७/२०१६ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे )

विषय क्र. ३) मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४/२३-२०१५-१६ मधील अ.क्र.१९ अन्वये प्रभाग क्र.३७ महात्मा फुलेनगर झोपडपट्टीतील संडास ब्लॉक नं.२ (४सिट्स) पाडून १६ सिट्सचे शौचालय बांधणेकामी मे.व्यंकटेश्वरा कंन्स्ट्रक्शन नि.र.रु.२७,९९,९५०/- (अक्षरी र.रु.सत्ताविस लाख नव्यान्नव हजार नऊशे पन्नास फक्त) पेक्षा १.५०% जास्त या ठेकेदाराकडून निविदा मजुंर दराने र.रु.२८,४१,९४९/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

( दिनांक ०५/०७/२०१६ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे )

विषय क्र. ४) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६२/२०१५-१६ मधील काम क्र. २ अन्वये दापोडी – निगडी या बीआरटीएस कॉरीडॉरचे एक्सप्रेस लेनची दुरूस्ती करणे या अंतर्गत बस स्टेशनसाठी साईजनेजेस पुरविणेकामी मे.एस.बी.सवई नि.र.रु. १,९३,१६,९१९/- (अक्षरी र.रु.एक कोटी त्र्यान्नव लाख सोळा हजार नऊशे एकोणीस फक्त) पेक्षा ३७.३७ % कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू. १,२७,०३,०९६/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

( दिनांक ०५/०७/२०१६ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे )

विषय क्र. ५) पिंपरी चिंचवड मनपाच्या वैद्यकीय विभागांतर्गत राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजने अंतर्गत वाय.सी.एम.रुग्णालयातील अस्थिरोग विभागासाठी लागणारे इम्प्लान्ट खरेदीबाबत प्रसिध्द केलेल्या ई-निविदा क्र.३/२०१५-१६ मधील लघुत्तम निविदाधारक मे. कोठारी मेडिकल्स यांच्या 283 बाबींकरीता येणा-या र.रु.39,57,532/25, मे. आकाश मेडिकेअर यांच्या 35 बाबींकरीता येणा-या र.रु.6,88,925/-, मे. प्राईम सर्जिकल्स अँन्ड फार्मा. यांच्या 25 बाबींकरीता येणा-या

र.रु.1,98,070/-, मे. डिव्हाईन एन्टरप्रायजेस यांच्या 52 बाबींकरीता येणा-या र.रु.5,73,030/-, मे. ऑटोकॅल यांच्या एका बाबीकरीता येणा-या र.रु.600/- मे. झेनेसिस मेडिकेअर यांच्या 2 बाबीकरीता येणा-या र.रु. 64,850/-, मे. आकाश मेडिकेअर व मे. प्राईम सर्जिकल (समान दर) यांच्या एका बाबीकरीता येणा-या र.रु.5,000/- व मे. कोठारी मेडिकल व मे. डिव्हाईन एन्टरप्रायजेस (समान दर) यांच्या 4 बाबींकरीता येणा-या र.रु.20,400/- व मे. कोठारी मेडिकल व मे. प्राईम सर्जिकल (समान दर) यांच्या एका बाबीकरीता येणा-या र.रु.5,550/- व मे. कोठारी मेडिकल व मे. आकाश मेडिकेअर (समान दर) यांच्या 3 बाबी करीता येणा-या र.रु.40,500/- याप्रमाणे प्राप्त झालेल्या दरांना एक वर्ष कालावधीसाठी मान्यता घेऊन करारनामा करुन खरेदी करणेकामी येणा-या एकूण र.रु. 55,54,457/25 (अक्षरी र.रु. पंचावन्न लाख च्योपन्न हजार चारशे सत्तावन्न पैसे पंचवीस फक्त) रकमेच्या खर्चास व एक वर्ष कालावधीत शस्त्रक्रियेसाठी आवश्यकतेनुसार मंजुर दरानुसार खरेदी करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि.०५/०७/२०१६ च्या सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र. ६) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील ३०.०० मी. रुंदी व सुमारे २९.०० कि.मी. लांबी असलेल्या वर्तुळाकार मार्गावर (HCMTR) मार्गावर ट्राम/बीआरटी/मोनो रेल/लाईट रेल/मेट्रो इ. सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्थेपैकी कोणत्या व्यवस्थेची अंमलबजावणी करणे योग्य होईल या करीता Feasibilitity Study करुन धोरणात्मक निर्णय घेणेकामी या क्षेत्रातील नामांकित केंद्र सरकारची कंपनी असलेल्या DMRCL, नवी दिल्ली यांची नियुक्ती करणे व त्यासाठी येणा-या र.रु. १,४५,००,०००/- अधिक सर्व्हिस टॅक्स / इतर टॅक्सचे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि.०५/०७/२०१६ च्या सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र. ७) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.53/2/2015-16 अन्वये, प्रभाग क्र.3 मधील मोरेवस्ती मधील श्रीकुंज हौ.सोसा.स्वामी विवेकानंद हौ.सोसा. व साने वस्ती मधील उर्वरीत ठिकाणी क्रॉक्रीट पेव्हींग ब्लॉक करणेकामी मे.ग्लोबल कन्स्ट्रक्शन नि.र.रु. 44,81,486/- (अक्षरी र.रु.चौरेचाळीस लाख एक्क्याऐंशी हजार चारशे शहाऐंशी फक्त) पेक्षा 49.99% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.23,53,251/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ / घट दरानुसार फरकाची रक्कम अदा / वसूल करणे बंधनकारक

राहील. या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि.०५/०७/२०१६ च्या सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र. ८) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.53/6/2015-16 अन्वये, प्रभाग क्र.3 चिखली येथील सोनवणेवस्ती शेलारवस्ती मध्ये उर्वरित ठिकाणी कॉक्रींट पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी मे.ग्लोबल कन्स्ट्रक्शन नि.र.रु.44,81,508/- (अक्षरी र.रु. चौरेचाळीस लाख एक्क्याऐंशी हजार पाचशे आठ फक्त) पेक्षा 49.99% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.23,53,262/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ / घट दरानुसार फरकाची रक्कम अदा / वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि.०५/०७/२०१६ च्या सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र. ९) श्री.सुनिल रामू धोत्रे सफाई कामगार यांच्या अपिल अर्जावर विचार करणे. (मा. स्थायी समिती सभा ठराव क्र.१६१९७ दि.१०/०५/२०१६ अन्वये)

(दि.०५/०७/२०१६ च्या सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र. १०) सुरक्षा विभागामार्फत ठेकेदारी पध्दतीने नियुक्त केलेल्या ई-निविदा सुचना क्र १,२,३/२०१४-२०१५ ट्रॅफिक वार्डन मदतनीस, रखवालदार मदतनीस कर्मचारी यांना १ जानेवारी २०१६ पासून मा.कमागार कल्याण अधिकारी यांनी कळविणेत आलेल्या मुळ वेतन ५१००/- दरपत्रकात झालेला बदल म्हणजेच महागाई भत्ता/विशेष भत्ता रक्कम रुपये २९५३.८० व बोनस ७०००*८.३३% प्रमाणे ५८३.१० व ज्या त्या निविदेत मान्य केलेल्या सर्व्हीस चार्ज गृहीत धरुन येणा-या रक्कमेवर माहे ३१ मे २०१६ पर्यंत १४.५% सर्व्हीस टॅक्स व ०१ जुन २०१६ पासून १५% सर्व्हीस टॅक्स गृहीत धरुन होत असलेल्याएकूण वेतन रक्कमेस ज्या-त्या निविदेत झालेल्या निर्णयान्वये/अटी शर्ती नुसार वेतन अदा करणेस व त्यापोटी येणा-या खर्चास मान्यता देणे बाबत विचार करणे.

(दि.०५/०७/२०१६ च्या सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र. ११) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या ओटी विभागातील MAQUET कंपनीच्या ०२ नग Operation Table (Sr.No.00672, 00678) ची दुरुस्ती (स्पॅोअर पार्टस खरेदी + दुरुस्ती) संबंधित उत्पादित कंपनी M/s. Maquet यांचेकडून निविदा न मागवता, करारनामा न करता, थेट पध्दतीने करणेस

तसेच सदर Operation Table दुरुस्त करणेकामी संबंधित उत्पादित कंपनीने मागणी केलेप्रमाणे त्यांना १००% आगाऊ रक्कम र.रु.४,०६,४८५/- (अक्षरी र.रु.चार लाख सहा हजार चारशे पंच्याऐंशी फक्त) देणेस व सदर दुरुस्तीसाठी होणारा खर्च र.रु.४,०६,४८५/- ला मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि.०५/०७/२०१६ च्या सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.१२) पिंपरी चिचंवड महानगरपालिकेच्या इ क्षेत्रिय कार्यालयाचे क्षेत्रातील प्रभाग क्र.६, ७, २९, ३२, ३३, ३४ व ३६ मधील स्ट्रॉर्म वॉटर चेंबर्स साफ सफाई करुन गाळाची वाहतुक करणे या कामाची नि.नो.क्र.२/२०१६-१७ अन्वये, र.रु.३,०१,८०६/- वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करुन दर मागविण्यात आले आहेत. सदरची निविदा दि.२५/५/२०१६ रोजी उघडण्यात आली आहे. सदर निविदाचे अनुषंगाने मे. श्री संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था यांनी अंदाजपत्रकीय र.रु.३,०१,८०६/- पेक्षा १५% कमी म्हणजेच र.रु.२,५६,५३५/- इतक्या रक्कमेची होत असल्याने सदरचे दर स्विकृत करणेत आले आहेत. याकामी सदर संस्थेबरोबर करारनामा करुन सदर संस्थेला कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१३) यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयामध्ये स्त्री रोग व प्रसुति शास्त्र या विभागाकरीता बंधपत्रीत वैद्यकीय अधिकारी ही दोन पदे मंजुर आहेत. परंतु रुग्णालयातील सदर विभागाच्या कामाचा ताण विचारात घेता अजुन तीन पदे मा.संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन (डी.एम.ई.आर.) मुंबई यांच्याकडुन भरणेस मंजुरी देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१४) यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामध्ये दरमहा एकत्रित मानधनावर ६ महिन्याकरीता वर्तमानपत्रात जाहिरात देऊन विविध पदे भरणेस व सदर पदांना अनुभवानुसार मानधन अदा करणेस व जर आवश्यक तेवढे उमेदवार न मिळाल्यास पुढील ६ महिने सदर पदे Walk in interview ने भरणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१५) मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र.६/३८/२०१५-१६ मधील अ.क्र.14 अन्वये प्रभाग क्र.30 मधील चक्रपाणी रोडच्या कडेने नविन पाईप लाईन टाकणेसाठी मे.व्ही.ए.झोंबाडे यांची, निविदा रक्कम रू.१४,००,४६६/- (अक्षरी र.रु. चौदा लाख चारशे सहाष्ट फक्त) पेक्षा २०.८०% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.११,६४,६२८/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम

अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र. १६) मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र.१७/१३/२०१५-१६ मधील अ.क्र.२ अन्वये, जलक्षेत्र क्र. १ ते १४ मध्ये आवश्यक ठिकाणी नविन बोअरवेल घेणे. या कामासाठी मे. जीवनधारा ट्यूबवेल कंपनी निविदा रक्कम रू.५,६०,११५/- (अक्षरी र.रु.पाच लाख साठ हजार एकशे पंधरा फक्त) पेक्षा अंदाजपत्रकीय (At PAR) दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.५,६०,११५/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र. १७) मनपाच्या ब क्षेत्रिय कार्यालय, पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.4/8/2015-2016 अन्वये-ब क्षेत्रीय स्तरावर सन २०१५-१६ साठी जलक्षेत्रक्र.बी/७ येथे पाणीपुरवठा विषयक कामांची देखभाल व दुरुस्ती करणेसाठी मे.यासीन कन्स्ट्रक्शन निविदा रक्कम रूपये 5,59,875/- पेक्षा -30.00% कमी या ठेकेदारांकडून काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे मे.यासीन कन्स्ट्रक्शन यांचेशी करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र. १८) मनपाच्या ब क्षेत्रिय कार्यालय, पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.5/1 - 2015-2016 अन्वये-ब क्षेत्रीय स्तरावर सन २०१५-१६ साठी जलक्षेत्र क्र.बी/५ अंतर्गत दळवीनगर येथे पाणीपुरवठा विषयक कामांची देखभाल व दुरुस्ती करणेसाठी मे.के.पी.कन्स्ट्रक्शन निविदा रक्कम रूपये 5,60,124/- पेक्षा 15.93% कमी या ठेकेदारांकडून काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे मे.के.पी कन्स्ट्रक्शन यांचेशी करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१९) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतुन वाहणा-या पवना नदीपात्रातील जलपर्णी/हायसिंथ काढणेचे काम क्षेत्रिय कार्यालय स्तरावर मनुष्यबळाव्दारे करण्यात येत आहे. तथापि आवश्यक त्या वेगाने सदरचे काम पुर्ण होत नसल्याने पर्यावरण विभागामार्फत यापुर्वी निविदा प्रसिध्द न करता थेट पध्दतीने पण करारनामा करुन मुळा नदीतील जलपर्णी मशिनचे सहाय्याने काढणेचे काम मे.

साई फ्राईट प्रा.लि.,व्होरा हाऊस, १४/१६ सुरत स्ट्रीट, मस्जिद (पुर्व), मुंबई-४०० ००९ यांनी सादर कलेला दरमहा दर र.रु.६,००,०००/- + शिफ्टींग चार्जेस र.रु.२०,०००/- + सर्व्हीस टॅक्स १२.५० या प्रमाणे करण्यात आले आहे. सदर कामाचा अनुभव लक्षात घेवुन सदर संस्थेकडुन सद्यस्थितीत पवना नदीपात्रातील हायसिंथ काढणेकामी मे.साई फ्राईट प्रा.लि.यांचेकडून दरमहा र.रु.६,००,०००/- + शिफ्टींग चार्जेस र.रु.२०,०००/- + सर्व्हीस टॅक्स १२.५० (शासन निर्णयानुसार आरोग्य विषयक कामासाठी सेवाकर देय नसल्याने सदरचा सेवाकर अदा न करता) या दराने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ५ (२) (२) नुसार विनानिविदा थेट पध्दतीने पण करारनामा करुन एक महिन्यापर्यंत किंवा आवश्यक कालावधीपर्यंत चालू ठेवणेकामी येणा-या खर्चास व त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२०) मुख्य लेखा परिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरी कामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरी देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र. २१) मनपा उदयान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.5/2016-17 करीता मनपाचे उद्यान विभागास बर्ड व्हॅली उद्यानासाठी एफ.आर.पी.केबीन्स खरेदी करणेबाबत मे.एन.डी.ए. प्लासटेक कोटेशन नोटीस र.रू.1,80,000/- (अक्षरी.र.रू.एक लाख ऐंशी हजार फक्त.) अंदाजपत्रकिय दरापेक्षा 0.1% ने कमी कोटेशन स्वीकृत करणेत आले असून आदेश उदयान/6/ कावि/315/2016 दि.10/06/2016 अन्वये कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र. २२) मनपा उदयान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.03/2016-17 करीता मनपाचे उद्यान विभागाचे वीर सावरकर उद्यान प्रेमलोक पार्क चिंचवड येथील लॉनचे नुतनीकरण करणेबाबत मे.निशांत एंटरप्रायझेस कोटेशन नोटीस र.रू.1,98,450/- (अक्षरी.र.रू.एक लाख अठ्ठ्यान्न हजार चारशे पन्नास फक्त.) अंदाजपत्रकिय दरापेक्षा 5.75% ने कमी कोटेशन स्वीकृत करणेत आले असून आदेश उदयान/6/ कावि/ /2016 दि. /06/2016 अन्वये कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र. २३) मनपा उदयान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.02/2016-17 करीता मनपाचे दुर्गादेवी उद्यानातील झाडांचे खोडे काढणे, खड्डे खोदणे व रस्ता तयार करणे कामी EX70 पोकलेन भाड्याने घेणेबाबत व पोकलेन वाहतुक करणेबाबत मे.क्राफ्ट कॉर्पो.लि. कोटेशन नोटीस र.रू.1,99,650/- (अक्षरी.र.रू.एक लाख नव्व्यान्नव हजार

सहाशे पन्नास फक्त.) अंदाजपत्रकिय दरापेक्षा 3% ने कमी कोटेशन स्वीकृत करणेत आले असून आदेश उदयान/6/कावि/ /2016 दि. /06/2016 अन्वये कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.२४) मनपा उदयान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.04/2016-17 करीता मनपाचे उद्यान विभागाचे से.नं.२७ नर्सरीसाठी मातीच्या (बेंगलोर मेड) कुंड्या खरेदी करणेबाबत मे.न्यु पारिजात गार्डन्स कोटेशन नोटीस र.रू.1,99,000/- (अक्षरी.र.रू.एक लाख नव्व्यान्नव हजार फक्त.) अंदाजपत्रकिय दरापेक्षा 7% ने कमी कोटेशन स्वीकृत करणेत आले असून आदेश उदयान/6/ कावि/ /2016 दि. /06/2016 अन्वये कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.२५) मनपा उदयान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.05/2016-17 करीता मनपाचे उद्यान विभागास उद्यानांसाठी तीन एफ.आर.पी.केबीन्स खरेदी करणेबाबत मे.एन.डी.ए. प्लासटेक कोटेशन नोटीस र.रू.1,95,000/- (अक्षरी.र.रू.एक लाख पंच्च्यान्नव हजार फक्त.) अंदाजपत्रकिय दरापेक्षा 0.5% ने कमी कोटेशन स्वीकृत करणेत आले असून आदेश उदयान/6/कावि/ /2016 दि. /06/2016 अन्वये कामाचा आदेश देणेत आला असल्याने अवलोकन करणे.

विषय क्र.२६) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.48/14/2015-16 अन्वये प्रभाग क्र.४१ मध्ये मुख्यालय स्तरावर किरकोळ दुरुस्तीची व देखभालची कामे करणे. सन २०१४-१५ कामी मे.एम.बी.कन्स्ट्रक्शन नि.र.रु.14,74,374/- (अक्षरी र.रु.चौदा लाख चौ-याहत्तर हजार तीनशे चौ-याहत्तर फक्त) पेक्षा 50.00% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.7,74,046/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ / घट दरानुसार फरकाची रक्कम अदा / वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.२७) मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो. क्र.४/२३-२०१५-१६ मधील अ.क्र.१४ अन्वये प्रभाग क्र.६१ मधील झोपडपट्टीमधील मनपा इमारती व शौचालयाची देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.व्यंकटेश्वरा कंन्स्ट्रक्शन (नि.र.रु ९,३०,८४०/- (अक्षरी र.रु.नऊ लाख तीस हजार आठशे चाळीस फक्त) पेक्षा १३.५०% कमी या ठेकेदाराकडून निविदा मजुंर दराने र.रु.८,०५,१७७/- पर्यंत काम करुन घेणेस बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा

करारनामा करुन एजन्सीस कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र. २८) मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो. क्र.४/२३-२०१५-१६ मधील अ.क्र. ६ अन्वये प्रभाग क्र.६४ मधील झोपडपट्टी मधील मनपा इमारती व शौचालयाची देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.व्यंकटेश्वरा कंन्स्ट्रक्शन (नि.र.रु.९,३०,८४०/- (अक्षरी र.रु.नऊ लाख तीस हजार आठशे चाळीस फक्त) पेक्षा १४% कमी या ठेकेदाराकडून निविदा मजुंर दराने र.रु.८,००,५२२/- पर्यंत काम करुन घेणेस बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन एजन्सीस कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.२९) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४७/०६/२०१५-१६. प्रभाग क्र. 21 दळवीनगर प्रेमलोक पार्क मधील आर.टी.ओ. ऑफिस जवळ वेस्टन पध्दतीचा सुलभ शौचालय बांधणे मे. एम.जे. कन्स्ट्रक्शन नि.र.रु.१४,००,१८३/- (अक्षरी र.रु.चौदा लाख एकशे त्र्याऐंशी रुपये फक्त) पेक्षा ३२.००% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.९,९९,७३१/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.३०) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४७/०२/२०१५-१६. प्रभाग क्र.20, 21, 22, 23, 24 व 42 या भागातील रस्ते व चौकामध्ये पादचा-यांसाठी सुविधा पुरविणे व वाहतूक सुधारणा विषयक कामे करणेकामी मे. आदित्य एंटरप्रायझेस नि. र.रु.२२,४०,९३४/- (अक्षरी र.रु.बावीस लाख चाळीस हजार नऊशे चौतीस रुपये फक्त) पेक्षा ४०.३०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र. रु.१४,०४,७२९/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतीलअटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधि न राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.३१) संत तुकाराम महाराज सोहळा मुक्कामाचे ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात ध्वनिक्षेपण व्यवस्था, प्रकाश व्यवस्था, जनित्र संच व्यवस्था, सी.सी.टी.व्ही. व्यवस्था व वारकरी मुक्कामाचे ठिकाणी जनित्र संच सहित प्रकाश व्यवस्था करणे आवश्यक

असल्याने सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकात पानांक ७६४ अ.क्र. ११ " अ क्षेत्रीय कार्यालया करिता होणा-या विविध कार्यकमा करिता तात्पुरती ध्वनीक्षेपण, प्रकाश व्यवस्था, जनित्रसंच, सी.सी.टीव्ही व अन्य विद्युत विषयक कामे करणे (सन २०१६-१७ करीता) " या कामा करिता र.रु ४,००,०००/- तरतूद असून तातडीची बाब असून निविदा न मागविता थेट पद्धतीने, करारनामा करुन मे.विजय इलेक्ट्रिकल्स & जनरेटर यांना यापूर्वीच्या मंजूर दराने १% कमी (नि.नो.क्र.१/११-२०१५-१६) देणेस व येणा-या र.रु.५,८१,०४६/- चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३२) मे.एशियन इलेव्हेटर, पुणे. हे स्वत: उत्पादक कं असून त्यांनी आजपर्यंत समाधानकारकपणे कामकाज केलेले आहे. त्यांनी सादर केलेले दर हे बाजारभावानुसार योग्य व वाजवी आहेत. तरी, यशवंतराव चव्हाण हॉस्पिटल येथील चार लिफ्टचे सन २०१६ ते २०१८ (३ वर्ष) कालावधीकरीता वार्षिक देखभाल दुरूस्ती करणेचे काम करारनामा करून करवून घेणेस व त्याकामी येणारा खर्च प्रतिवर्षि (र रू २,५३,७४२/- + टॅक्सेस), मे एशियन इलेव्हेटर, पुणे यांस आगावू अदा करणेस व दुरूस्तीकामी वापरलेल्या साहित्याचा प्रत्यक्ष खर्च त्या त्या वेळी अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र. ३३) मनपाचे सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक मा. स्थायी समिती सभेसमोर सादर केलेले आहे. सदर अंदाजपत्रकासाठी मा. आयुक्त सो. यांच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना सभेत देणेकरिता छपाई करणेकामी कोटेशन क्र. १/१५-१६ अन्वये बंद पाकिटात दरपत्रक मागविणेत आले होते. त्यानुसार कोटेशन नोटीस क्र.१/ १५-१६ एकूण ३ कोटेशन दरपत्रक प्राप्त झालेले आहेत. प्राप्त दरपत्रकातील लघुत्तम कोटेशनधारक मे. सिध्दी कॉपीअर्स, संत तुकारामनगर, पिंपरी पुणे यांचे छपाईकामी एकूण र.रु.३०,६७५/- चे दर स्विकृत करणेत आलेले आहेत. प्रस्तुतकामी दिलेल्या कार्यारंभ आदेशाची माहितीचे अवलोकन करणे.

विषय क्र. ३४) नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र “अ” मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजुरी कामी मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र. ३५) इ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र.6 मोशी येथील जलक्षेत्र क्र.1 मधील मोशी जाधववाडीच्या हद्दीलगतचा २४ मी.डी.पी.रस्त्याच्या कडेने व उर्वरित ठिकाणी डी.आय जलवितरण नलिका टाकणे कामातुन मोशी चौकात पुणे नाशिक रस्ता राष्ट्रीय महामार्ग यांना कळविलेप्रमाणे मुख्य डांबरी रस्ता न खोदता बोर मारुन पाईप लाईन टाकणेच्या कामासाठी खालीलप्रमाणे रक्कम भरावी लागणार आहे.

१) रेस्टॉरेशन चॉजेस रुपये १०९७५५/- डी.डी.स्वरुपात भरणे.

२) वन टाईम लायसन्स फी रुपये १७८२०/- डी.डी.स्वरुपात भरणे.

३) बँक गॅरेंटी रुपये १८००/- बँक गॅरेंटी जमा करणे.

एकुण रक्कम रुपये १,२९,३७५/- इतका खर्च कळविला आहे. त्यानुसार सदरचे काम पुर्ण करणे गरजेचे असलेने रक्कम रुपये १,२९,३७५/-(अक्षरी र.रु.एक लाख एकोणतीस हजार तीनशे पंच्याहत्तर फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी तसेच सदरची रक्कम अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र. ३६) दिघी गायरान गट क्र.७७ येथे १०,००० वृक्षारोपण करणे व त्याची ३ वर्षे देखभाल करणेचे कामास येणारे प्रति वृक्ष ६१०/- प्रमाणे येणारे र.रू.६१,००,०००/- खर्चास मा.स्थायी समिती ठराव क्र.१३३०८ दि.१०/११/२०१५ अन्वये मान्यता मिळालेली असुन सदर वृक्षारोपण दिघी गायराण ऐवजी जागा बदल करून सी.एम.ई.दापोडी हद्दीतील सी.ई.डी.यु.२६२ येथे १०,००० वृक्षारोपण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र. ३७) मनपाच्या वैद्यकिय विभागाअंतर्गत राष्ट्रीय कार्यक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकामी आवश्यक लागणा-या 3 ते 5 वर्षाचे आतिल टुरिस्ट परमिट (पिवळे नंबरप्लेट) असलेल्या 11 टाटा सुमो अथवा तत्सम वाहने (6+1) भाडे तत्वावर घेणेकामी प्रसिध्द करणेत आलेल्या ई-निविदा क्र.15/2015-16 मधील लघुत्तम दर निविदाधारक ओम एंटरप्रायझेस यांचे प्राप्त दर, प्रतिवाहन प्रतिदिन 60 किमीसाठी र.रु.1500/- प्रमाणे व प्रति 60 किमी पुढील अंतरासाठी र.रू.8.50/- दर या प्रमाणे एकूण र.रू.99,00,000/- खर्चास मा.स्थायी समितीची मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र. ३८) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांसाठी उत्पादीत कंपनीकडील आवश्यक प्रोजेक्टर साहित्य खरेदी कामी ऑनलाईन ई-निविदा सु.क्र.०६/२०१६-१७ अन्वये प्रसिध्द करून ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. त्यानुसार तीन निविदाधारकांकडून ऑनलाईन दर प्राप्त झालेले आहेत. प्राप्त दरपत्रकामध्ये मे.झूमकॉम्पुटर्स यांचे प्रोजेक्टर साहित्याचे एकूण १० नगांसाठी एकूण र.रु.७,७३,९००/- लघुत्तमदर प्राप्त झाले आहेत. मनपाचे विविध विभागांकरीता सोनी कं.चे प्रोजेक्टर खरेदी करणे आवश्यक आहेत. सदरचा खर्च हा अंदाजपत्रकीय

रक्कमेपेक्षा १.१४% ने कमी असल्याने सदरचे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक /नस -०३/कावि/४९४/२०१६
दिनांक - ०१/०७/२०१६.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.